क्रमांक : ८३६७ /ड-३ (समिती समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २१ एप्रिल, २०२२.

## : : परिपत्रक : :

**संदर्भ :** **(१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.७९३/ड-३ दिनांक १४ जानेवारी, २०२२.**
**(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.२९०८/ड-३ दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२.**
**(३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५२७७/ड-३ दिनांक १४ मार्च, २०२२.**

मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये राज्यातील कोविड-१९ या महामारीचा विशेषत: ओमायक्रॉन या नविन कोविड प्रकाराचा वाढता संसर्ग लक्षात घेता विधानमंडळ समित्यांच्या बैठका/दौरे आयोजित करण्यात येऊ नयेत असे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व समिती कक्षांना कळविण्यात आले होते. आता राज्यातील कोविड-१९ संदर्भातील निर्बंध हटविले असल्याने समित्यांच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठका व दौरे आयोजित करण्यास मा. पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने अनुमती देण्यात येत आहे. परंतु, कोविड केसेस वाढल्यास दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीचे परिपत्रक पुन्हा लागू होईल. एका महिन्यामध्ये एका जिल्ह्यात एकापेक्षा अधिक समित्यांनी दौरे आयोजित करु नयेत. तसेच प्रत्येक समितीने दोन महिन्यांच्या दौऱ्याचा आगाऊ कार्यक्रम मा.पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेसाठी "ड-३" (अंदाज समिती) कक्षामार्फत सादर करावा, या अटींच्या अधिन राहून दौरे आयोजित करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

**( राजेन्द्र भागवत )**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) सर्व समित्यांचे मा.समिती प्रमुख व मा.सदस्य.

२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्ष नेते (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.